# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २१/०१/२०२५ (मंगळवार) सकाळ**


## पवन धिरज हिरणवार खुन प्रकरणात मुख्य आरोपी आणि त्याच्या साथीदाराला केली अटक खापरखेडा पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन खापरखेडा अंतर्गत दिनांक ०२/०१/२०२५ रोजी सायंकाळी ०४.०० ते ०४.३० वाजता दरम्यान बाबूलखेडा चिचोली शेतशिवार येथे रोडवर पवन धिरज हिरणवार, शैलेश विनोद हिरणवार, सिध्दार्थ दिनेश कोवे, सोनु शेंद्रे, हिमांशु गजभिये हे कार मधून बाबूल खेडा येथील मारूती चे दर्शन घेवून परत येत असतांना शेखु खान व त्याचे साथीदारांनी टू–व्हिलरवर येवून पवन धिरज हिरणवार व त्याचे साथीदार बसलेली कार थांबवून त्याचे वर गोळीबार केला. यामध्ये पवन धिरज हिरणवार हा मयत झाला असून शैलेश विनोद हिरणवार याचे फिर्याद वरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथे खुनाचा गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयामध्ये मुख्य आरोपी गुलनवाज उर्फ शेखु इजाज खान,वय ३४ वर्षे,रा १०७,उत्थान नगर,गोरवाडा रिंग रोड,मानकापुर नागपुर आणि त्याचा साथीदार अजहर शेख रफिक शेख ,वय ३४ वर्षे रा गटाटे बिल्डींग ग्राउंड फ्लोअर,केअर हॉस्पीटल च्या मागे ,पंचशिल चौक ,नागपुर यांना खापरखेडा पोलीस यांनी गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधार योग्य तपास करून सावनेर रोड वरील लाहोरी धाब्याजवळुन ताब्यात घेवुन दिनांक २१/०१/२०२५ रोजी अटक केली आहे. आरोपी गुलनवाज उर्फ शेखु इजाज खान याचे वर नागपुर शहर अंतर्गत पोलीस स्टेशन अंबाझरी येथे ६ गुन्हे, पोलीस स्टेशन सिताबर्डी येथे ३ गुन्हे ,पोलीस स्टेशन धंतोली येथे १ गुन्हा, पोलीस स्टेशन मानकापुर येथे १ गुन्हा ,पोलीस स्टेशन सोनेगाव येथे १ गुन्हा,पोलीस स्टेशन गिटटीखदान १ गुन्हा, पोलीस स्टेशन खापरखेडा १ गुन्हा ,पोलीस स्टेशन आरपी नगर १ गुन्हा ,पोलीस स्टेशन कोतवाली १ गुन्हा ,पोलीस स्टेशन बजाजनगर १ गुन्हा ,आणि पोलीस स्टेशन हिंगणा येथे २ गुन्हे दाखल आहे.तसेच त्याला एमपीडीए कायदयन्वये स्थानबध्द करण्यात आले होते.दिनांक २६/०७/२०२४ रोजी येरवडा मध्यवर्ती करागृह येथुन स्थानबध्दतेतुन मुक्त करण्यात आले होते. यातील दुसरा आरोपी अजहर शेख रफिक शेख याचे वर नागपुर शहर अंतर्गत पोलीस स्टेशन गिटटीखदान येथे १ गुन्हा, पोलीस स्टेशन प्रतापनगर येथे १ गुन्हा ,पोलीस स्टेशन अंबाझरी येथे १ ,पोलीस स्टेशन गडचिरोली येथे १ गुन्हा दाखल आहे.दिनांक २५/०१/२०२५ पर्यंत दोन्ही आरोपी चा पि.सी.आर मंजुर आहे.

यापुर्वी खापरखेडा पोलीसांनी सदर गुन्हयाच्या तपासात आरोपी नामे १) सिध्दार्थ उर्फ गण्या दिनेश कोवे वय १९ वर्षे ,२)प्रथम उर्फ बाबु मनोज शाक्य,वय २२ वर्षे ,३) अभिराज कैलास कनोजिया, वय २२ वर्षे, ४)ललित उर्फ अवि अरूण भुसारी, वय ३० वर्षे, ५)नितेश उर्फ अंकीत रामचंद्र धोंडगे, वय २३ वर्षे, ६) सेवक उर्फ देवदास तुलाराम मसराम वय ४८ वर्षे, ७)रितीक शैलेश अवसरे, वय २५ वर्षे यांना अटक केली आहे.

# पोलीस हवालदार विशाल तुमसरे यांच्या प्रकृतीबाबत

नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील पोलीस हवालदार विशाल तुमसरे यांनी दिनांक १८/०१/२०२५ रोजी पहाटे मा श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्या निवसास्थानी ,जामठा येथे रात्रपाळीत गार्ड डयुटीवर असतांना स्वत:वर गोळी झाडली होती. सदर घटना घडली तेव्हा मा श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांनी लागलीच स्वत: विशाल तुमसरे यांना स्वत:च्या वाहनात तात्काळ ऐम्स हॉस्पीटल ,नागपुर येथे उपचाराकामी दाखल केले.तुमसरे यांचेवर शस्त्रक्रीया झाली असुन आज दिनांक २१/०१/२०२५ रोजी विशाल तुमसरे यांना अतिदक्षता विभागातुन बाहेर काढले असुन आता धोक्याच्या स्थितीच्या बाहेर आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**